# महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग
# वैदयकिय अधिकारी (गट-अ) ची पदे कंत्राटी स्वरुपात भरण्यासाठी पदभरती
# कार्यपध्दतीचा मसुदा

---

**संदर्भ :-**

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक :- मवैअ/१०५४/प्र.क्र.२४१/सेवा-३/ दि.०२/०३/२०१५
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक :- मवैअ/१०५४/प्र.क्र.२४१/सेवा-३/ दि.२१/०४/२०१५
३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक :- मवैअ/१०५४/प्र.क्र.२४१(भाग-१)/सेवा-३/दि.०३/१२/२०१८
४) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक :- मवैअ/१०५४/प्र.क्र.२४१/भाग - २/सेवा-३/दि.०४/०७/२०१९

---

१) सोलापूर जिल्हातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य संस्थामध्ये महाराष्ट्र वैदयकिय व आरोग्य सेवा गट-अ, संवर्गातील वैदयकिय अधिकारी या पदावर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी भरतीकरीता एम.बी.बी.एस PG (पदव्युत्तर पदवी)/ एम.बी.बी.एस(पदवी)/एम.बी.बी.एस/बी.ए.एम.एस पात्र उमेदवारांना मुलाखती (Walk In Interview) व्दारे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्यासाठी कंत्राटी पद भरती करणे करीता अर्ज मागविण्यात येत आहे.

**एकुण पदसंख्या -४४**

- **ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालय येथे भरावयाची** एम.बी.बी.एस PG (पदव्युत्तर पदवी)/ एम.बी.बी.एस(पदवी)/एम.बी.बी.एस धारक **कंत्राटी वैदयकीय अधिकारी यांची पदे -१०**
- **प्राथमिक आरोग्य केंद्रात भरावयाची** एम.बी.बी.एस PG (पदव्युत्तर पदवी)/ एम.बी.बी.एस(पदवी)/एम.बी.बी.एस/**बी.ए.एम.एस** धारक **कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची पदे -३४**

वर नमूद केलेल्या पदसंख्येतबदल (कमी अगर जास्त) होण्याची शक्यता आहे. तसेच भविष्यात वेळोवेळी होणा-या रिक्त पदासाठी मुलाखती **या** दर महिन्याच्या तिस-या मंगळवारी (सदर दिवशी शासकीय सुट्टी आल्यास दुसर-या दिवशी) घेण्यात येतील.

२) **वेतन-**

MBBS पदवी (पदव्युत्तर पदवी/ पदवी)-MD धारक कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना एकत्रित मानधन दरमहा रुपये ८५,०००/-

MBBS पदवी धारक कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना एकत्रित मानधन दरमहा रुपये ७५,०००/-

BAMS पदवी धारक कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना एकत्रित मानधन दरमहा रुपये ४०,०००/-

वरिलप्रमाणे ज्या-त्या वेळच्या शासन निर्णया नुसार एकत्रीत मानधन देय राहील याव्यतिरिक्त नियमित कोणतेही फायदे मिळण्यास सदर उमेदवार पात्र राहणार नाही.

३) **वय** :- मुलाखतीच्या दिवसापर्यंत ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

४) **शैक्षणिक अर्हता :- सांविधानिक विद्यापिठाची एम.बी.बी.एस/बी.ए.एम.एस पदवी** ही अर्हता **असावी.**

५) **अटी व शर्ती:-**

१) निवड प्रक्रियेसाठी विहीत करण्यात आलेल्या निकषानुसार गुणांचे मुल्यांकन करण्यासाठी खालील प्रमाणे साक्षाकिंत कागदपत्रे उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा उमेदवाराचा अर्ज रददबातल करण्यात येऊन ग्राहय धरला जाणार नाही.

1. (MBBS/BAMS) अंतिम वर्षाचे गुणपत्र
2. अटेम्प्ट प्रमाणपत्र
3. PG (पदव्युत्तर पदवी/ पदवी) अंतिम वर्षाचे गुणपत्र
4. शासकिय संस्थेत काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र (जिल्हा शल्यचिकीत्सक/जिल्हा आरोग्य अधिकारी/ अधिष्ठाता यांच्या स्वाक्षरीने)
5. MMC/MCIM वैध कालावधिचे नोंदणी प्रमाणपत्र.

२) प्राप्त अर्जाची छाननी करुन खालीलप्रमाणे अंतिम वर्षाच्या गुणवत्ता व शासकिय सेवेच्या अनुभवानुसार पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

| अ.क्र. | तपशिल | गुण | सक्षमप्रमाणपत्र |
|---|---|---|---|
| १ | एम.बी.बी.एस. / बी.ए.एम.एस. | ३० | अंतिम वर्ष गुणपत्रिका (प्रत्येक अटेम्प्ट करीता २ गुण कमी करण्यात येईल) |
| २ | पदव्युत्तर पदवी (डिग्री) | २० | उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र |
| ३ | पदवीका (डीप्लोमा) | १० | उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र |
| ४ | प्राथमिक आरोग्य केंद्र/ ग्रामीण रुग्णालय/ उप जिल्हा रुग्णालय/वैद्यकीय महाविद्यालय/उपकेंद्र येथे काम केल्याचा अनुभव (कमीतकमी अकरा महिने करिता) | २० | जिल्हा शल्यचिकीत्सक/जिल्हा आरोग्य अधिकारी/ अधिष्ठाता स्वाक्षरीचे अनुभव प्रमाणपत्र |
| ५ | प्राथमिक आरोग्य केंद्र/ ग्रामीण रुग्णालय/ उप जिल्हा रुग्णालय/वैद्यकीय महाविद्यालय/उपकेंद्र येथे काम केल्याचा अनुभव (वरिल अकरा महिन्यानंतर प्रत्येक महिन्यास २ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण) | २० | जिल्हा शल्यचिकीत्सक/जिल्हा आरोग्य अधिकारी/ अधिष्ठाता स्वाक्षरीचे अनुभव प्रमाणपत्र |
| | एकूण गुण | १०० | |

३) वरील प्रमाणे प्राप्त अर्जाची छाननी करुन एकत्रित मिळालेल्या गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांना जेष्टतेनुसार रिक्त पदावर कमाल ११ महिन्यासाठी आदेश देण्यात येईल. गुणानुक्रमानुसार (प्राप्त गुण समान असलेतरी) गुणव-ता यादी ही अनुक्रमे MBBS+PG Degree, MBBS+PG Diploma, BAMS+PG, BAMS (एम.बी.बी.एस. व बी.ए.एम.एस यांच्या पदव्युत्तर पदवी/ पदवीका) या पदवीधारकानुसार राहिल व प्रत्येक शैक्षणिक अर्हतेनुसार स्वतंत्र जेष्ठता यादी तयार करण्यात येईल.

४) मुलाखत ही महिन्यातील दर तिस-या मंगळवारी (सदर दिवशी शासकीय सुट्टी आल्यास दुसर-या दिवशी) जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयामध्ये सकाळी ११:०० ते दुपारी २:०० वाजेपर्यंत घेण्यात येईल. त्याचप्रमाणे प्रतिक्षा यादी ठेवण्यात येणार नसल्यामुळे निवड न झालेल्या उमेदवारास मुलाखतीस अर्ज करावयाचे झाल्यास त्यांना प्रत्येक मुलाखतीच्या दिवशी स्वतंत्र अर्ज करावा लागणार आहे याची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी. (भरती प्रक्रिया चालु असल्याचे अथवा स्थगीत केल्याची माहीती जिल्हा परीषद, सोलापूर यांच्या शासकीय संकेस्थळावरुन खात्री करुनच उपस्थीत रहावे)

५) सदर मुलाखती जिल्हा निवड समिती, सोलापूर किंवा समिती प्राधिकृत करेल त्या ठिकाणी त्यांच्या समक्ष अथवा समिती प्राधिकृत करेल त्यांच्या समक्ष घेण्यात येईल.

६) नवनियुक्त वैदयकिय अधिका-यासाठी मुख्यालयी राहणे बंधनकारक राहील. त्यांचे वेतन हे बायोमेट्रीक हजेरीशी संलग्न असेल.

७) कंत्राटी वैद्यकीय अधिकारी हे शासकीय नियमित कर्मचा-याप्रमाणे कोणतेही फायदे मिळण्यास पात्र असणार नाहीत.

८) उपलब्ध रिक्त पदे विचारात घेऊन पदव्युत्तर पदवी/पदविका धारकांना प्राधान्य देण्यात येईल.

९) ज्या रिक्त ठिकाणी एम.बी.बी.एस/पदव्युत्तर पदवी/पदविका (विशेषतज्ञ) धारक उपलब्ध होणार नाहीत त्या रिक्त ठिकाणी एम.बी.बी.एस अर्हताधारकांना नियुक्ती देण्यात येईल.एम.बी.बी.एस अर्हताधारक उपलब्ध न झाल्यास बी.ए.एम.एस अर्हताधारकांना नियुक्ती देण्यात येईल. तदनंतर जर एम.बी.बी.एस उमेदवार मिळाल्यास, बी.ए.एम.एस धारक वैदयकिय अधिकारी यांची सेवा अपोआप संपुष्टात येईल. सदरची सेवा समाप्त करताना जो वैद्यकीय अधिकारी शेवटी हजर झालेला आहे त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल व इतर ठिकाणी रिक्त असल्यास त्याठिकाणी नियुक्ती देण्याबाबत प्राधान्य देण्यात येईल. ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालय येथे BAMS अर्हता धारकांना नियुक्ती देण्यात येणार नाही.

१०) नियुक्त झालेल्या वैद्यकीय अधिकारी यांना राजीनामा द्यावयाचे असल्यास एक महिना पुर्वी संबधित खाते प्रमुखाकडे (जिल्हा आरोग्य अधिकारी/ जिल्हा शल्यचिकीत्सक) लेखी अर्ज सादर करणे आवश्यक आहे किंवा तात्काळ राजीनामा द्यावयाचे असल्यास एक महीन्याचे एकत्रित मानधन भरावे लागेल.

११) खालील कारणास्तव कोणतेही पुर्व सुचना न देता सेवा समाप्त करण्यात येईल.

११.१) दोन दिवसापेक्षा जास्त कालावधी विना परवाना गैरहजर.
११.२) कामामध्ये निष्काळजीपणा
११.३) बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी न लावणे.
११.४) कामकाजात अकार्यक्षम असणे, सेवेची कर्तव्य व जबाबदारी कटाक्षाने न पाळणे.

११.५) गैरवर्तन/गैरव्यवहार केलेले निदर्शनास आल्यास
११.६)प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या खाजगी व्यवसाय करत असल्याचे निदर्शनास आल्यास
११.७) कार्यरत पदावर बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी अथवा नियमित वैद्यकीय अधिकारी बदलीने/नियुक्तीने हजर झाल्यास सेवा आपोआप संपुष्टात येईल.

१२) कार्यरत पदावर नियमित वैद्यकीय अधिकारी बदलीने/नियुक्तीने हजर झाल्यास सेवा आपोआप संपुष्टात येईल.

१३) तदर्थ/कंत्राटी वैद्यकीय अधिकारी या पदावर नियुक्ती झाल्यानंतर वरील कारणास्तव एकदा कार्यमुक्त केल्यानंतर कोणत्याही सबबीवर पुन्हा सेवेत नियुक्ती मिळणार नाही.

१४) वरील सर्व पदे ही कंत्राटी स्वरुपा ची व एकत्रित मानधनावरील असल्याने, सदर पदा करीता शासकिय सेवे नुसार असलेले नियम, अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही. त्याच सोबत यावरील सर्व पदाकरीता शासनाकडील सेवा नियम लागू होत नाहीत.

१५) शासन सेवाशर्तीच्या अधिन ही तदर्थ/कंत्राटी सेवा असल्याने त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतेही प्रकारचे लाभ मिळण्यास उमेदवार पात्र राहणार नाहीत.

१६) सदर पद हे तदर्थ/कंत्राटी स्वरुपातील असल्यामुळे सदर पदावर कायम करण्याबाबत भविष्यात कोणतेही अधिकार सांगणार नाही व त्यासाठी आंदोलन/संप/बंद करणार नाही व त्यामध्ये भाग घेणार नाही. तसेच सदर आदेशाचा आधार घेऊन सेवा नियमीत करणेबाबत मा. न्यायालयात दाद मागता येणार नाही अशा आशयाचे रु.१०० चे बंधपत्र देणे बंधनकारक राहील.

१७) वरील अटी व शर्तीमध्ये तसेच विहीत पध्दती बदल करण्याचे अधिकारी निवड समीतीकडे राखीव राहतील.

६) **सर्वसाधारण** अटी:-

०६.१) निवड झालेल्या उमेदवारांस कोणत्याही प्रकारचा खाजगी व्यावसाय करता येणार नाही व तसे दरमहा प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.

०६.३) निवड झालेल्या उमेदवाराने महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल ॲक्ट, १९६५ (महाराष्ट्र) एक्स.एल. व्हि.आय.(१९६५) किंवा इंडियन मेडीकल कौन्सिल ॲक्ट, १९५६ (१९५६ चा १०२) व महाराष्ट्र कौन्सील ऑफ इंडियन मेडिसीन यांच्याकडे वैध कालावधीचे नोंदणी असणे आवश्यक आहे.

७) **महत्वाचे.**

कागदपत्रे पडताळणी प्रक्रियेवेळी/ मुलाखतीस उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारांची निवड करण्याचे संपुर्ण अधिकार व अंतिम निर्णय निवड समितीकडे राखुन असतील.

८) प्रथम मुलाखत यशवंतराव सभागृह, जिल्हा परीषद, सोलापूर येथे शुक्रवार, दि.11/08/2023 रोजी सकाळी 11:00 वाजल्यापासुन सुरु होतील त्या करीताचे अर्ज दि.09/08/2023 रोजी पर्यंत जिल्हा शल्य चिकीत्सक, सोलापूर यांच्या कार्यालयात सोमवार ते शुक्रवार, सकाळी 11:00 ते सायं.05:00 वाजेपर्यंत स्वीकारले जातील.

स्थळ :- सोलापूर
दिनांक :-०१/०८/२०२३

जिल्हा शल्यचिकित्सक
तथा सदस्य सचिव
निवड समिती सोलापूर,

| | | |
|---|---|---|
| सत्यमेव जयते | **महाराष्ट्र शासन - आरोग्य सेवा**<br>**जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय,सोलापूर** | सार्वजनिक आरोग्य विभाग |

**कंत्राटी वैद्यकीय अधिकारी पदासाठी उमेदवारांने करावयाचा अर्ज नमुना**

**दिनांक :- / /२०२३**

**प्रति**
**मा.जिल्हा शल्यचिकीत्सक**
**सोलापूर.**

फ़ोटो

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१ | उमेदवारांचे संपुर्ण नाव (अडनाव प्रथम) | | | |
| ०२ | सध्याचा पत्ता | | | |
| ०३ | कायमचा पत्ता | | | |
| ०४ | दुरध्वनी क्रमांक (मो.नं) | | | |
| ०५ | स्त्री/पुरुप | | | |
| ०६ | जन्म दिनांक (शालांत प्रमाणप्रत्रानुसार) | दिवस | महिना | वर्षे |
| | | | | |
| ०७ | मुलाखती रोजीचे वय | वर्षे | महिना | दिवस |
| | | | | |
| ०८ | शैक्षणिक पात्रता (MBBS /MBBS PG /BAMS/ BAMS PG)- | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०९ | संदर्भीय कागदपत्रे | | आहे ( √ )/नाही ( × ) | | | |
| अ. क्र. | तपशील | मिळालेले गुण/संख्या/ दिनांक | आहे | नाही | पृष्ठक्र. |
| १ | MBBS/BAMS अंतिम वर्षाचे गुणपत्र व गुण - | | | | |
| २ | पदवी/पदविका अंतिम वर्षाचे गुणपत्र व गुण - | | | | |
| ३ | उत्तीर्ण प्रमाणपत्र (Passing Certificate) | | | | |
| ४ | एम.एम.सी/एम.सी.आय.एम नोंदणी प्रमाणपत्र | | | | |
| ५ | एम.एम.सी/एम.सी.आय.एम नुतनीकरण केलेले प्रमाणपत्र व वैधता दिनांक - | | | | |
| ६ | अटेम्प्ट प्रमाणपत्र व एकूण अटेम्प्ट संख्या - | | | | |
| ७ | अनुभव प्रमाणपत्र | | | | |
| ७.१ | प्राथमिक आरोग्य केंद्र/ ग्रामीण रुग्णालय/ उप जिल्हा रुग्णालय अनुभव प्रमाणपत्र (कमीतकमी अकरा महिने करिता) व एकूण महीने - | | | | |
| ८ | ओळखपत्र (उदा - आधार कार्ड, पॅन कार्ड,) | | | | |

टिप- वरील कागदपत्रे स्वतः सांक्षाकित व पृष्ठांकीत करुन सादर करावे.

उमेदवारांचे नाव व स्वाक्षरी